ePaper

# ठाकरे कुटुंबाचा कथित घोटाळा होणार उघड: किरीट सोमय्या



वर्ष - 7 । अंक - 2 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- म्हाडाच्या अधिकाऱ्यांना घेराव
- मराठा समाज पुन्हा रस्त्यावर उतरणार
- "पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विषारी सापासारखे..."


www.mahaenews.com | । शुक्रवार , दि. 28एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पुणे- मुंबई द्रुतगतीमार्गावर

# विचित्र अपघात!



10 पेक्षा जास्त वाहने एकमेकांना धडकली, सुदैवाने जीविहितहानी नाही

।पिंपरी महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबई द्रुतगतीमार्गावर वाहने एकमेकांना धडकून विचित्र अपघात झाला असून काही जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. दुपारी एकच्या सुमारास खोपोली एक्झिट येथे हा अपघात झाला. सुदैवाने या अपघातात जीविहितहानी झालेली नाही. या अपघातामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक काही वेळ विस्कळीत झाली होती.

### बोरघाटात तीव्र उतारावर घडली घटना...

» या अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव ट्रकच्या चालकाचे नियंत्रण सुटून किंवा ब्रेक निकामी झाले, त्यानंतर या ट्रकची वाहनांना धडक बसली असावी असाही एक प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. बोरघाटात तीव्र उतारावर ही घटना घडली आहे. अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना खोपोली येथील रुग्णालयात घेऊन जाण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, अपघातग्रस्त सामाजिक संस्था घटनस्थळी पोहचल्या.

# पिंपरी महापालिकेचे वर्षभरात विजेवर १४८ कोटी खर्च!

## » सौर ऊर्जा यंत्रणा बसविण्याचा निर्णय अद्याप बासनातच

। पिंपरी। महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड महापालिकेने वीज बचत आणि विजेला पर्याय म्हणून पालिकेच्या ८४ मालमत्तांवर सौर ऊर्जा यंत्रणा बसविण्याचा गतवर्षी निर्णय घेतला होता. मात्र, हा निर्णय अद्याप प्रत्यक्षात येऊ शकलेला नाही. त्यामुळे महापालिकेला वीजदेयकापोटी १४८ कोटी रुपये खर्च करावे लागणार असल्याचे समोर आले आहे.

महापालिकेच्या ९५० विविध मालमत्तांना महावितरणकडून वीज पुरवठा केला जातो. त्यात लहान-मोठी २०० उद्याने, महापालिका मुख्य इमारत, आठ क्षेत्रीय कार्यालय, आठ





मोठी रुग्णालये, २८ दवाखाने, २० आरोग्य सेवा केंद्र, लसीकरण केंद्रे, तीन प्रेक्षागृहे, जलशुध्दीकरण केंद्र, सीसीटीव्ही यंत्रणा, १०५ प्राथमिक तर १८ माध्यमिक अशा १२३ शाळांचा समावेश आहे. त्यासाठी पालिकेला दरवर्षी ५३.४५ मेगावॅट वीज लागते. वीज वापरासाठी महापालिका वर्षभरात १४८ कोटी रुपये खर्च करते. महापालिकेच्या ९५० मालमत्तांसाठी महावितरणकडून वीज घेण्यात येते. २०२३-२४ या आर्थिक वर्षांत वीज देयकापोटी १४८कोटी रूपये महावितरणला द्यावे लागणार आहेत, अशी माहिती महापालिकेच्या विद्युत विभागाचे सहशहर अभियंता बाळासाहेब गलबले यांनी दिली.

### सौर ऊर्जा यंत्रणेचा अभाव

» महापालिकेच्या ९५० मालमत्तांपैकी केवळ ६४ मालमत्तांवर सौर ऊर्जा यंत्रणा कार्यान्वित आहे. त्याद्वारे दररोज चार हजार २४० युनिट वीज निर्मिती होते. त्यामुळे महापालिकेची वार्षिक एक कोटी ४१ लाखांची बचत होत आहे.

# म्हाडाच्या अधिकाऱ्यांना घेराव!

## तळेगाव दाभाडे प्रकल्पातील किंमती वाढल्याने आंदोलन

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे गृहनिर्माण मंडळातर्फे (म्हाडा) तळेगाव दाभाडे येथील प्रकल्पाची २०१६ ची सोडत काढण्यात आली. सोडतीच्या जाहिरातीत घराची किंमत १४ लाख रुपये होती. मात्र; अचानक 'म्हाडा'ने अडीच लाख रुपये वाढवून १६ लाख ५० हजार रुपये किंमत केली आहे. संबंधित लाभार्थी सदनिकाधारकांनी पुणे म्हाडा कार्यालयात अधिकाऱ्यांना घेराव घातला आणि जाब विचारला.**



या गृहनिर्माण योजनेत ७९६ घरे आहेत. 'म्हाडा'तर्फे २०१६ ची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात बांधकाम सुरू असलेल्या सुमारे ३०.६७ चौरस मीटर सदनिकेची किंमत १४ लाख रुपये नमूद केली होती. ती आता सुमारे १६ लाख ५० हजार रुपये केली आहे. यावर 'म्हाडा'ने नमूद केले की, रेरा, जीएसटी, पार्किंग, पाण्याचा भार, वाढलेले बांधकाम साहित्याचे भाव, वाढलेले मजुरीचे दर आदींमुळे सदनिकेच्या किमतीत वाढ झाली आहे.

### लाभार्थ्यांच्या तक्रारी

'आमचे उत्पन्न अत्यल्प असून, त्यासोबतच आता गृहकर्जाचे हप्ते आणि मी सध्या राहत असलेल्या घराचे भाडेदेखील मला भरावे लागत आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मला महारेराच्या मुदतीनुसार ३० जून २०२३ पर्यंत माझ्या हक्काच्या सदनिकेचा ताबा द्यावा अथवा ताबा देईपर्यंत घरभाडे मिळावे,' अशी सामूहिक मागणी लाभार्थ्यांनी केली आहे. गृहकर्जाच्या नियमानुसार ९० टक्के बांधकाम पूर्ण होऊन, खरेदीखत किंवा करारनामा होत नाही. तोपर्यंत बँक पुढील हप्ता देण्यास तयार होत नाही, अशी लाभार्थ्यांची तक्रार आहे.

### काय आहे प्रकार?

"म्हाडा कार्यालयाने प्रत्येक इमारतीनुसार बनवलेल्या 'व्हॉट्सअॅप' ग्रुपवर बेनामी असलेले एक पत्रक पोस्ट केले होते. ज्यात सुधारित रक्कम म्हणून २.५ लाख रक्कम वाढवून सांगून गॅलरी हे वाढीव क्षेत्र असल्याचे दाखवले होते. यासंदर्भात कोणताही सदनिकाधारक वाढीव २.५ लाख रुपये रक्कम भरण्यास अजिबात तयार नाही. प्लॅननुसार गॅलरी ही सदनिकेत आधीपासूनच आहे आणि सॅम्पल फ्लॅटमध्येसुद्धा एकूण क्षेत्र तेवढेच असून, गॅलरीदेखील आहे. इमारत बांधणी नियमानुसार गॅलरीशिवाय इमारत होऊच शकत नाही, असे लाभार्थ्यांनी म्हटले आहे.

### या आहेत मागण्या

- सदनिकेचा ताबा 'रेरा'च्या नियमाप्रमाणे असलेल्या मुदतीत देण्यात यावा.
- योजना आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी असून, त्यास केंद्र सरकारचे (पंतप्रधान आवास योजना) अनुदानदेखील द्यावे.
- वाढीव एरिया तसेच वाढीव रक्कम रद्द करावी, तसेच शेवटचा संपूर्ण हप्ता माफ करावा.
- एकूण १० टक्के रक्कम कमी करावी.
- ताबा देईपर्यंत लाभार्थ्यांना घरभाडे द्यावे.

### दहा दिवसांत निर्णय घेणार

- तळेगाव दाभाडे प्रकल्पातील सदनिकांच्या किमतीत अडीच लाखांची वाढ केली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी वाढीव किंमत माफ करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मागणीचे निवेदन स्वीकारले आहे. याबाबत प्रस्ताव तयार करून, म्हाडाच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात येईल. पुढील दहा दिवसात निर्णय घेण्यात येईल, असे एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# अजित पवारांचं एकनाथ शिंदेंना पत्र, इतिहासाचा दाखला, निर्णय घेण्याची मागणी

## वेल्हे तालुक्याचं नामांतरण राजगड तालुका करण्याची मागणी, मुख्यमंत्री मार्ग काढणार?

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पुणे जिल्ह्यासंदर्भात मोठी मागणी केली आहे. पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचं नामांतरण राजगड तालुका असं करावं, त्यासंदर्भातील प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी मागणी पत्रामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केल्याचं अजित पवार यांनी सांगितलं आहे.**

अजित पवार यांनी प्रथम राजधानी असलेल्या राजगड किल्ल्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी २७ वर्षे शासन चालवलं, असं म्हटलं. वेल्हे तालुक्यातील नागरिकांच्या भावना राजगड किल्ल्याशी जोडल्या गेल्या आहेत.

म्हणूनच वेल्हे तालुक्याचं नामकरण हे राजगड करण्यात यावं, अशी नागरिकांची तीव्र इच्छा आहे, असं अजित पवार म्हणाले. याबाबत तालुक्यातील ७० ग्रामपंचायतींपैकी ५८ ग्रामपंचायतींनी नामकरणासाठी सकारात्मक ठराव दिला आहे, असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे.



### अजित पवारांचं पत्र

**विषय :- पुणे जिल्हयातील वेल्हे तालुक्याचे नामांतरण "राजगड" असे करणेबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये पुणे जिल्हयातील वेल्हे तालुक्याचे नामांतरण राजगड तालुका करणेबाबत लोकभावना तीव्र आहेत. याबाबत जिल्हा परिषद पुणे यांचे दि. २२.११.२०२१ रोजीच्या सर्वसाधारण सभेत ठराव करुन वेल्हे तालुक्यातील ७० ग्रामपंचायतीपैकी ५८ ग्रामपंचायतींनी वेल्हे तालुक्याचे नाव राजगड असे करणेबाबत सकारात्मक ठराव दिले आहेत. वेल्हे तालुक्यामध्ये स्थित असलेल्या राजगड या किल्ल्याशी तालुक्यामधील तमाम नागरिकांचे जिव्हाळयाचे संबंध असून सदर किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रथम राजधानी असल्यानं सदर ठिकाणावरुन छत्रपती शिवाजी महाराज यांनी २७ वर्षे शासन चालविले असल्याने वेल्हे तालुक्याचे नामकरण राजगड असे करण्यात यावे अशी वेल्हे तालुक्यातील नागरिकांची तीव्र इच्छा आहे.

वेल्हे तालुका हा शिवकालीन व ऐतिहासिक वारसा असलेला आणि किल्ले मालिकेतील किल्ले राजगड व किल्ले तोरणा असे दोन महत्वपूर्ण किल्ले समाविष्ट असलेला तालुका आहे.

या तालुक्याचे जुने दस्त पाहता किल्ले तोरणाचे नाव प्रचंडगड या नावाने तालुक्याची ओळख होती. तथापि, सदर तालुक्याचे मुख्य ठिकाण हे वेल्हे बु. घेरा या ठिकाणी असलेने तालुक्याचे नाव वेल्हे असे नमूद आहे.

> "वेल्हे तालुक्यातील तमाम नागरिकांच्या भावना या राजगड किल्ल्याशी जोडलेल्या असून छत्रपती शिवाजी महाराजांची प्रथम राजधानी या तालुक्यामध्ये स्थित असल्याने किल्ले राजगड वरुन या तालुक्याचे नामकरण "राजगड" करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, ही विनंती.
> — अजित पवार, विरोधी पक्षनेते

## बेकायदा जाहिरात फलक आढळल्यास

# परवाना निरीक्षकांवर फौजदारी कारवाई!

### » पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांचा इशारा

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या परवाना निरीक्षकांनी २८ एप्रिलपर्यंत शहरातील सर्व लोखंडी जाहिरात फलकांचे (होर्डिंग) सर्वेक्षण करून छायाचित्रांसह अहवाल सादर करावा. शुक्रवारनंतर शहरात बेकायदा फलक आढळल्यास शिस्तभंगासह, फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचा इशारा आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी परवाना निरीक्षकांना दिला आहे.**





किवळेतील फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर प्रशासन खडबडून जागे झाले आहे. न्यायालयात प्रलंबित असलेल्या ४३४ बेकायदा फलकांव्यतिरिक्त ७२ नव्याने बेकायदा फलक आढळून आले आहेत. यापैकी ६५ फलक काढले आहेत.

### निरीक्षकांवर शिस्तभंगासह कडक कारवाई...

**» या तपासणीमध्ये निरीक्षकांनी सादर केलेल्या अहवालातील मोजमापामध्ये व प्रत्यक्ष तपासणीतील मोजमापामध्ये तफावत आढळून आली. तसेच बेकायदा फलक आढळल्यास पालिकेची दिशाभूल केल्याचा ठपका निरीक्षकांवर ठेवण्यात येणार आहे. निरीक्षकांवर शिस्तभंगासह, फौजदारी स्वरूपाची कडक कारवाई करण्यात येणार आहे.**

न्यायप्रविष्ठ फलकांव्यतिरिक्त बेकायदा फलक शहरात असल्याचे सर्वेक्षणातून समोर आल्यानंतर भविष्यात दुर्घटना घडू नये, यासाठी आयुक्त सिंह यांनी आकाश चिन्ह विभागाच्या परवाना निरीक्षकांना शहरातील सर्व फलकांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. २५ ते २८ एप्रिल दरम्यान हे सर्वेक्षण पूर्ण करायचे आहे.सर्वेक्षण करताना फलकांची संख्या, स्थळ, मंजूर मोजमाप आणि प्रत्यक्ष असणारे मोजमाप याचा स्वतंत्र स्वाक्षांकित अहवाल निरीक्षकांनी छायाचित्रांसह तयार करावा. या अहवालानंतर आयुक्त सिंह, अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, विभागप्रमुख नीलेश देशमुख सर्व फलकांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करणार आहेत.

---

# विनापरवाना गैरहजर राहणाऱ्या दोन सहाय्यक आयुक्तांना नोटीस

### » 24 तासाच्या आत कर्तव्यावर रुजू व्हावे, अन्यथा शिस्तभंगाच्या कारवाईचा इशारा

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मंजूर रजा कालावधी संपल्यानंतरही विना परवाना गैरहजर राहणा-या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दोन सहाय्यक आयुक्तांना आयुक्त शेखर सिंह यांनी कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे. २४ तासाच्या आत कर्तव्यावर रुजू व्हावे. अन्यथा शिस्तभंगाच्या कारवाईचा इशारा दिला आहे.**



पिंपरी महापालिकेत प्रतिनियुक्तीवर असलेले उपजिल्हाधिकारी संवर्गातील निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त बाळासाहेब खांडेकर आणि आकाश चिन्ह व परवाना विभागाचे प्रशांत जोशी हे जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहेत. दोघेही मागील तीन महिन्यांपासून बदलीसाठी प्रयत्न करत आहेत. त्यासाठी सातत्याने रजेवर जात आहेत. खांडेकर यांनी वैयक्तीक कारणास्तव २१ मार्च ते १३ एप्रिल २०२३ या कालावधीत रजा घेतली. परंतु, रजा कालावधी संपून १३ दिवस झाले.

तरी, खांडेकर अद्यापही रुजू झाले नाहीत. तर, जोशी हे १७ ते २१ एप्रिल दरम्यान रजेवर होते. रजा कालावधी संपून पाच दिवस उलटून तेही रुजू झाले नाहीत. दोघांनीही अनुउपस्थितीबाबत कोणतेही पूर्वकल्पना दिली नाही. कामावर रुजू झाले नसल्याने कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे आयुक्त सिंह यांनी दोघांनाही कारणे दाखव नोटीस बजाविली. नोटीस मिळाल्यापासून २४ तासाच्या आत कर्तव्यावर रुजू व्हावे.

अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, भूमी आणि जिंदगी विभागाचे उपायुक्त सचिन ढोले, ह क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकारी सुषमा शिंदे हे दोघेही रजेवर आहेत. विभाग चांगला मिळाला नसल्याने दोघे रजेवर गेले असल्याची महापालिका वर्तुळात चर्चा आहे.

---

# मालमत्ता कर देयकांच्या वितरणासाठी 'सिद्धी उपक्रम'

### महापालिकेच्या वतीने 300 महिलांकडून देयकांचे वाटप

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

महापालिकेच्या वतीने महिला सबलीकरणासाठी २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची देयके ३०० महिलांच्या मार्फत वाटण्यास प्रारंभ केला आहे. देयके घेऊन आलेल्या महिलांना योग्य ते सहकार्य करण्याचे आवाहन करआकारणी व करसंकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले.

पिंपरी- चिंचवड शहरात पाच लाख ९७ हजार ७८५ मालमत्ता आहेत. करआकारणी व करसंकलन विभागाने देयकांची छपाई केली आहे. बचत गटाच्या महिलांना सोमवारी (दि. २४) प्रशिक्षण दिले. महिलांना मालमत्ता कराच्या देयकाची, नागरिकांची कोणती माहिती भरून घ्यायची त्या विषयी माहिती देण्यात आली. देयके वाटपात सुसूत्रता आणण्यासाठी योग्य नियोजन करून महिलांना ओळखपत्रेही देण्यात आली आहेत. देयकांचे वाटप सुरू केले आहे.

करसंकलन विभागाच्या ॲपद्वारे महिला माहितीचे संकलन करणार आहेत. मालमत्ताधारकांचा संपर्क क्रमांक, पत्ता नव्याने समाविष्ट करता येणार आहे. मालमत्तेचे अक्षांश व रेखांश मिळाल्याने मालमत्ता शोधणे सोपे जाणार आहे. प्रत्येक मालमत्तेचे छायाचित्र घेता येणार. त्यामुळे मालमत्तेची माहिती परिपूर्ण होण्यास मदत होईल. अद्ययावत माहितीचा फायदा करसंकलन विभागास पुढील काळात वसुली, देयके वाटपास होणार आहे. दरम्यान, मालमत्ताकराच्या देयकावर नाव, मोबाइल क्रमांक बरोबर आहे का, याची खातरजमा करावी.



**"मालमत्ताकराच्या देयकांचे वेगाने वाटप होण्यासह सर्व माहिती अद्ययावत करण्यासाठी सिद्धी उपक्रम हाती घेतला आहे. महिला अतिशय उत्तम प्रकारे हा उपक्रम यशस्वी करतील, असा विश्वास असल्यानेच हे काम महिला बचत गटांना दिले. महिलांना ओळखपत्र दिले आहे. गृहनिर्माण सोसायट्यांनी महिलांचे ओळखपत्र आणि देयके पाहून सोसायटीमध्ये प्रवेश द्यावा.**

**– शेखर सिंह आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

## संपादकीय »

# निर्यात-निर्भरतेचे काय?

***जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक जे काही म्हणाले त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याची सोय आपल्या सर्वोच्च सत्ताधीशांस आहेच. त्या विषयावर कोणी काही प्रश्न विचारण्याचीही शक्यता नाही.***

तसेच उत्तर प्रदेशात पोलीस बंदोबस्तात, त्यांच्या नाकाखाली झालेल्या दोन हत्यांचीही दखल घ्यावी असे काही नाही. तसेही ते गुंड होते. परत 'त्यांच्या'तले. तेव्हा त्यावरही काही भाष्य करण्याची गरज आहे, असे अजिबात नाही. याबाबत स्वत:स पुरोगामी, विवेकी म्हणवून घेणारे दोन-चार दिवस बडबडतील, चॅनेलीय चर्चा झडतील आणि हे सारे कसे आपल्या नेत्याच्या बदनामीचे कटकारस्थान आहे असे म्हणत भक्तमंडळी पुढील पूजोत्सवास लागतील. म्हणजे या साऱ्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष होणे शक्य आहे आणि तसेच ते होईल. तथापि ठरवूनही दुर्लक्ष करता न येणारा काही महत्त्वाचा तपशील गेल्या आठवड्याच्या अखेरीस केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने प्रसृत केला. तो आहे देशाच्या निर्यातीबाबत. निर्यात वाढली की डॉलर्समध्ये कमाई होते आणि आयात अधिक झाल्यास जास्त डॉलर्स द्यावे लागतात. निर्यातीतून होणारी कमाई आणि आयातीवर होणारा खर्च यांतील तफावत म्हणजे चालू खात्यातील तूट. वाणिज्य खात्याने जाहीर केलेला गेल्या महिन्याविषयीचा अंदाजित तपशील या तुटीबाबत नाही. तर तो आहे भारताच्या घसरत्या निर्यातीबाबत. ही बाब अनुल्लेखाने मारावी अशी नाही. त्याचमुळे; तेल दरवाढ आणि रशिया-युक्रेन युद्ध हे भारताच्या आर्थिक स्थैर्यासमोरील मोठे आव्हान आहे, अशी कबुली अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांस द्यावी लागली. निर्यातीतील घट समोर येणे आणि अर्थमंत्र्यांस हे विधान करावे लागणे हा घटनाक्रम लक्षात घेता सदर तपशिलावर भाष्य करणे आवश्यक ठरते.

याचे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे सरलेल्या मार्च महिन्यातील उत्पादित वस्तुमालाची निर्यात घट ही गेल्या तीन वर्षांतील सर्वात मोठी ठरते. ती १३.९ टक्के, म्हणजे साधारण १४ टक्के इतकी मोठी आहे. परिणामी भारताने निर्यातीतून कमावलेले उत्पन्न ३८३८ कोटी डॉलर्स इतके भरते. याआधी करोना-काळात आपले निर्यात उत्पन्न ३४ टक्क्यांनी गडगडले होते. त्यानंतरची ही सर्वात मोठी घसरण म्हणावी लागेल. त्याच वेळी भारताने आयात केलेल्या उत्पादनांचे मोल ५८११ कोटी डॉलर्स इतके आहे.

# घटनाबाह्य 'जीएसटी लवादा'ची कथा!




**राज्याराज्यांचे विक्री कर वा सेवा कर लयाला जाऊन 'एक राष्ट्र – एक 'वस्तू व सेवा कर" पद्धती संसदेच्या खास अधिवेशनात ३० जून २०१७ च्या मध्यरात्रीनंतर अस्तित्वात आली, हा प्रसंग ऐतिहासिकच. परंतु ही वस्तू व सेवा कर (जीएसटी) पद्धती प्रत्यक्षात, केंद्र आणि राज्यांच्या अनेकानेक परस्परसंबद्ध कायद्यांतून राबवली जाते.**




यापैकी 'केंद्रीय वस्तू व सेवा कर कायदा- २०१७' हा महत्त्वाचा कायदा, त्या कायद्यात राज्याराज्यांमध्ये किंवा केंद्राशी होऊ शकणारे जीएसटीविषयक तंटे सोडवण्यासाठी 'जीएसटी लवाद' (जीएसटी ट्रायब्यूनल) स्थापण्याचीही तरतूद होती आणि त्यानुसार हा लवाद स्थापनही झाला. मात्र सर्वोच्च न्यायालयाकडून कररचना आणि करआकारणी यांसंदर्भात तोवर आलेल्या अनेक निर्णयांशी या लवादाच्या तरतुदी (प्रामुख्याने नियुक्ती आणि सदस्य रचनेबद्दलचे कलम १०९ व ११०) विसंगत आहेत, असा निर्णय मद्रास उच्च न्यायालयाने, 'मद्रास रेव्हेन्यू बार असोसिएशन वि. भारत सरकार' या प्रकरणात २० सप्टेंबर २०१९ रोजी दिला. त्या निर्णयाविरोधात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात वेळेवर आव्हान दिले नाही- कारण बहुधा, या तरतुदी उघडच विसंगत असल्याचे मान्य असावे. याचा परिणाम असा की, २०१९ च्या सप्टेंबरपासून आजतागायत, आपल्या देशामध्ये 'जीएसटी लवाद' अस्तित्वातच नाही.

वास्तविक लवाद हेही न्यायदान प्रक्रियेचाच भाग असतात, लवादांसारख्या विषय-विशिष्ट तंटामुक्ती मंचामुळे नेहमीच्या न्यायालयांवरील कार्यभार कमी होतो. पण खेदाची बाब अशी की, नव्याने 'जीएसटी लवाद' स्थापण्याच्या तरतुदी 'वित्त विधेयक-२०२३' मध्ये अगदी अखेरच्या दिवशी समाविष्ट करण्यात आल्या आणि संसदेतील गदारोळामुळे या तरतुदींवरील कोणत्याही चर्चेविनाच हे विधेयक संमतही झाले.

नवा लवाददेखील तितकाच घटनाबाह्य ठरणारा आहे आणि त्यातील अनेक तरतुदी या सर्वोच्च न्यायालयाकडून आजवर सात प्रकरणांमध्ये जी तत्त्वे आणि बंधने लागू राहिली, त्या सर्वांशी विसंगतच आहेत. या सात प्रकरणांपैकी सर्वात जुना निकाल संपतकुमार (१९८७) प्रकरणातील आहे, तर एल. चंद्रकुमार (१९९७) हे दुसरे प्रकरण आहे. अन्य पाचही प्रकरणे मद्रास बार असोसिएशनने केलेल्या याचिकांची (२०१०, २०१४, २०१५, २०२०, २०२१) आहेत.

'जीएसटी लवाद' स्थापनेच्या नव्या तरतुदींमध्ये, या लवादावर न्यायिक सदस्य म्हणून काम करण्यास वकिलांना मज्जाव करण्यात आलेला आहे. अलीकडेच, ग्राहक मंचाबाबत अशाच मज्जावाची झालेली तरतूद अवैध ठरलेली आहे. तो अपवाद वगळता बाकी सर्वच लवादांवर वकिलांना अशा प्रकारची बंदी नसते हा तर मुद्दा आहेच, पण विचार करून पाहा : देशव्यापी महत्त्वाच्या जीएसटी लवादावर कुणा जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती- जरी त्यांचा करविषयक कायद्यांचा अभ्यास कमी असला तरीही केवळ ते वकील नसून न्यायाधीश आहेत या एका कारणास्तव- होऊ शकते; पण वकील मात्र विक्री कर वा तत्सम क्षेत्रातील दीर्घ अनुभवी असले तरीही त्यांचा विचार नाही, हे कितपत तर्कसंगत आहे? जीएसटी लवादावर नियुक्तीची प्रक्रिया आणखीही काही कारणांनी आक्षेपार्ह ठरते. 'आधी शोध-निवड समितीने केंद्र सरकारला दोन नावांची शिफारस करायची, मग सरकार त्यापैकी एक नाव निवडणार,' अशी पद्धत अयोग्य असल्याचे, 'लवाद सुधारणा अधिनियम- २०२१' मधील याच प्रकारच्या बदलांबाबत सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे. 'जीएसटी लवादाच्या शोध-निवड समितीचे प्रमुखपद सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींकडे असावे आणि दोघा वरिष्ठ केंद्रीय सचिवांचा समावेश या समितीत असावा.

**सध्या एकापाठोपाठ एक घडणाऱ्या विचित्र घटनांनी राजकारण आणि समाजकारण ढवळून निघालंय. सगळं बघत आणि ऐकत असलेल्या सर्वसामान्य माणसाच्या मनात असंख्य प्रश्न आहेत, प्रचंड कोलाहल आहे. काय योग्य काय अयोग्य, काय नैतिक काय अनैतिक, कुठली श्रद्धा आणि कुठली अंधश्रद्धा, काय कायदेशीर काय बेकायदेशीर... प्रश्न अनेक; पण उत्तरे काही सापडत नाहीयेत.**

# कोलाहल...



जिथे बघावं तिथे समाज माध्यमांवर रकानेच्या रकाने भरून गरळ ओतली जातेय, सार्वजनिक मंचांवर अर्वाच्य भाषेचा सर्रास वापर होतोय, राजकीय नेत्यांच्या समारंभात आयोजलेल्या अश्लील नृत्याच्या तालावर तरुणाई बेधुंद होऊन नाचतेय, कुठे भरचौकात गोळ्या झाडल्या जात आहेत, कुठे मयत गावगुंडासाठी मेणबत्ती मोर्चे निघतात आणि कुठे उन्हाच्या झळीने भरसभेत माणसं तडफडून मरताहेत!

हे सगळं का? कोणामुळे? कोणासाठी? खरंतर प्रश्न हासुद्धा आहे की 'या सगळ्या कोलाहलात मी कुठल्या बाजूचा/बाजूची?' मी भाषणं देणाऱ्या शामियानातल्या थंडाईचा एक भाग, की मी बाहेर बसलेल्या अफाट गर्दीचाच अंश? ती बिनचेहऱ्याची गर्दी जिला स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व नाही, जिला स्वतःचा स्वतंत्र विचार नाही. ती गर्दी तिथे का होती? कोणी म्हणे श्रद्धेपोटी, कोणी म्हणे पोटातल्या भुकेपोटी. आजकाल म्हणे राजकीय समारंभासाठी गर्दीला आपल्या नेत्यांची नावही माहीत नसतात! तरीही आम्ही तिथे असतो, आम्ही घोषणाही देतो आणि आम्ही टाळ्याही वाजवतो!

मग आम्ही गोंधळतो आणि मन रमवत राहतो चर्चांमध्ये.. आम्ही गंगा भागीरथी की आम्ही सौभाग्यवती की आम्ही कुमारी? संस्कृतीच्या नावावर आम्ही निवांत लचके तोडत राहतो स्वातंत्र्याचे आणि सन्मानाचे. मनाला पटो न पटो; पण साथ देत राहतो कुठल्या ना कुठल्या उन्मत्त विचारधारांची. त्या विचारधारांमागे मेंढरासारखी जाणारी गर्दी कशावरून एक दिवस खोल दरीत पडून कपाळमोक्ष करून घेणार नाही?

इथे आमच्या खिशात लेकरांना खायला घालायला वीस रुपयेही नसतात आणि आम्हाला 'वीस हजार कोटी कुठे गेले' या प्रश्नात गुंतवून ठेवलं जातं. महिन्याअखेरीस पगारासाठी लाचार झालेल्या आम्हाला स्वातंत्र्यापूर्वी परकीय सत्तेसमोर कोण लाचार झालं होतं आणि कोण नाही हे सांगून पेटवलं जातं. सगळ्यात मोठी गंमत म्हणजे पोटातली आग विसरून गर्दीही धडाडून पेटते. आम्हाला समजत इतकंच नाही, की पेटणारेही आम्हीच आणि जळून राख होणारेही आम्हीच असतो! शामियानातल्या मंडळींचं फारसं काहीही जात नाही हो! राजकारण करणारे वेगळे आणि समाजकारण करणारे वेगळे, हे समजण्याची गरज आहे आणि या दोहोंतल्या रेषाही दिवसागणिक पातळ होत चालल्या आहेत, हे समजण्याचीही!

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा समाज पुन्हा रस्त्यावर उतरणार

## मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर करण्यात आलेली होती याचिका दाखल




।मुंबई।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर सुप्रीम कोर्टमध्ये याचिका दाखल करण्यात आलेली होती. सदर याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. राज्य सरकारने सुप्रीम कोर्टमध्ये पुनर्विचार याचिका दाखल केली होती. मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर ही याचिका दाखल करण्यात आलेली होती.**

राज्य सरकारची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली असून हा सरकारला धक्का बसला आहे. यानंतर आता राज्यात पुन्हा एकदा मराठा समाज आक्रमक झाला आहे. आता राज्यात पुन्हा संघर्ष पाहिला मिळणार आहे.

यासंदर्भात इंदापूरमध्ये मराठा समाजाची बैठक झाली. या बैठकीत महत्वाचा निर्णय घेण्यात आला. इंदापूरमध्ये मराठा समाजाच्या वतीने आरक्षणासंदर्भात बैठक आज (गुरुवारी) झाली. या बैठकीत मराठा समाजाला 50 टक्क्यांच्या आतील ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी महत्वाचा निर्णय घेण्यात आला.

मराठा समाजाने आता थेट तुळजापूर ते मंत्रालय असा मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला 'मराठा वनवास यात्रा' नावाने संबोधले जाणार आहे. या महामोर्चाच्या निमित्ताने एक मराठा, लाख मराठा ही घोषणा पुन्हा एकदा गुंजणार आहे.

तसेच आरक्षणाचा तिढा सुटत नाही तोपर्यंत आझाद मैदानावर समाज बांधव ठाण मांडून बसणार आहे. तसेच याच ठिकाणी शिवराज्याभिषेक दिन साजरा केला जाणार आहे.

मराठा समाज येत्या 6 मे ला मराठा आरक्षण एल्गार परिषद घेणार आहे. याबाबतची घोषणा मराठा आरक्षण समन्वय समितीने केली आहे.

मराठा आरक्षण समिती, मराठा क्रांती मोर्चा आणि सकल मराठा समाज या परिषदेतून सरकारला शेवटचा इशारा देणार आहेत.

मराठा समाज आता वनवास यात्रेतून न्याय मागणार असल्याचे मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक सुनील नागणे यांनी म्हटलयं.दरम्यान २२ एप्रिलला मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सरकारचा निषेध म्हणून मराठा समाजाच्या वतीने पंढरपुरमध्ये केंद्र आणि राज्य सरकारचा पुतळा जाळून निषेध नोंदवण्यात आला होता.

### मराठा समाजाच्या प्रमुख मागण्या

- आरक्षण मिळत नाही तोपर्यंत नोकर भरती करू नये.
- अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांच्या स्मारकाचे काम तात्काळ सुरू करावे.
- सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न तात्काळ सोडवावा.
- मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील आंदोलकावरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत.
- पंजाबराव देशमुख निर्वाण भत्ता व वस्तीगृहाचा लाभ सरसकट मराठा विद्यार्थ्यांना मिळावा.
- कोपर्डी प्रकरणातील आरोपींना झालेल्या फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी तात्काळ करावी.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातून मिळणाऱ्या कर्ज प्रकरणासाठीच्या जाचक अटी रद्द कराव्यात.

# पुण्यातील पाणीकपातीचा निर्णय आठ दिवस पुढे ढकलला!

## हवामान विभागाचा अंदाज; पाणीटंचाईची स्थिती येण्याची शक्यता

। पुणे।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।




**यंदा मोसमी पावसाचा अंदाज पाहता धरणातील पाणीबचत करणे आवश्यक आहे. त्यामुळे आठवड्यातून एक दिवस पाणीकपातीचा प्रस्ताव महापालिकेकडून सादर करण्यात आला होता. मात्र, शहरात आठवड्यातून एक दिवस पाणीकपात केल्यास काही भागात पुढच्या दिवशी पाणीपुरवठा विस्कळीत होतो. परिणामी पाणी वितरणातील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी महानगरपालिकेने आठ दिवसांत उपाययोजना सादर कराव्यात. तोवर शहरात पाणीकपात सुरू करण्यात येणार नाही, असा निर्णय बुधवारी घेण्यात आला.**

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

हवामान विभागाच्या यंदाचा अंदाज पाहता पाणीटंचाईची स्थिती येण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने मंत्रिमंडळाच्या बैठकीतही चर्चा झाली आहे. तसेच शासनपातळीवरुन विविध उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. धरणातील उपलब्ध पाणी ऑगस्टपर्यंत कसे पुरवता येईल याद्दष्टीनेही नियोजन करण्यात येत आहे. शहरासाठी १५ जुलैपर्यंत पाण्याचे नियोजन करण्यात आले असून दर आठवड्याला एक दिवस पाणीकपात केल्यास हेच पाणी ऑगस्टपर्यंत पुरवता येऊ शकते. मात्र, एक दिवस पाणीकपात केल्यास काही भागात त्या पाठोपाठचे काही दिवस पाणीपुरवठा विस्कळीत होतो, अशी तक्रार लोकप्रतिनिधींनी बैठकीत केली. त्यावर महापालिकेने अभ्यास करुन आठ दिवसात तांत्रिक उपाययोजनांचे सादरीकरण करावे. तोपर्यंत पाणीकपात करण्यात येणार नाही, असे पालकमंत्री पाटील यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, खडकवासला प्रकल्पांतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्यातून ग्रामीण भागासाठी दुसरे उन्हाळी आवर्तन १ मेपासून सुरू करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. सध्या खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चार धरणांत ११.६१ अब्ज घनफूट ( टीएमसी) पाणीसाठा आहे. त्यानुसार दुसऱ्या उन्हाळी आवर्तनात साडेचार ते पाच टीएमसी पाणी सोडण्यात येणार आहे, तर शहरासाठी १५ जुलैपर्यंत ४.५३ टीएमसी पाणी राखून ठेवण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला आहे.

# "बारसूमध्ये पोलिसांची छावणी उभी, ग्रामस्थांना तडीपारीच्या नोटीसा

।राजापूर ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।



रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात बारसू गावात प्रस्तावित असलेल्या रिफायनरी प्रकल्पाला ग्रामस्थांनी कठोर विरोध केला आहे. माती परीक्षणाकरता अधिकारी आले असता त्यांनी या सर्वेक्षणाला विरोध केला.

यावेळी ग्रामस्थांनी तेथे आंदोलन छेडले. मात्र, यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याचा दावा करण्यात येत आहे. तसंच, या आंदोलकांना अटकही करण्यात आली होती. "राजापुरातील या गावात आता पोलिसांची छावणी उभी राहिली आहे, येथील ग्रामस्थ नैसर्गिक न्यायापासून वंचित आहेत", अशी माहिती खासदार विनायक राऊत यांनी दिली. आज पत्रकार परिषद घेऊन त्यांनी राजापुरातील वस्तुस्थिती कथन केली आहे.

"शंभर टक्के स्थानिक ग्रामस्थ असलेल्या लोकांना मी भेटून आलो. रत्नागिरी, रायगड, ठाणे, कोल्हापूर या परिसरातील पोलिसांना बोलावून पोलिसांची छावणी उभी केली आहे. एसआरपीचे दलही बोलावण्यात आले. अशा पद्धतीने पोलिसी छावणी उभी केल्याने तिथल्या ग्रामस्थांना घरीही जाता येत नाही. आजारी माणसाला डॉक्टरकडेही जाता येत नाही. चाकरमन्याला आपल्या गावी जाता येत नाही. रिफायनरी आम्हाला नकोय हे लोकशाही पद्धतीने सांगणाऱ्या कार्यकर्त्यांना रेल्वेतून उतरताच ताब्यात घेतलं जातंय, असं विनायक राऊत म्हणाले.

# नरेंद्र मोदी हे विषारी सापासारखे!

## काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंचं वादग्रस्त वक्तव्य



। नवी दिल्ली महाईन्यूज ।

**पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करताना मल्लिकार्जुन खरगेंचा संयम सुटला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विषारी सापासारखे आहेत. तुम्ही त्यांना विषारी समजा किंवा समजू नका. मात्र या विषामुळे तुम्ही मरुन जाल. मोदी हे काय चांगले व्यक्ती आहेत का? तर तसं अजिबात नाही. तुम्ही त्यांना चांगलं समजत असाल आणि जवळ जाल तर अशी निद्रा निजाल की पुन्हा तुम्हाला जाग येणार नाही. मल्लिकार्जुन खरगेंनी हे वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. त्यानंतर भाजपाने त्यांच्या विरोधात टीकेची झोड उठवली आहे.**

भाजपाने काय म्हटलं आहे?

मल्लिकार्जुन खरगेंच्या या वक्तव्यानंतर गृहराज्य मंत्री नित्यानंद राय यांनी हे ट्वीट केलं की खरगे यांनी मोदींचा उल्लेख विषारी साप असा करणं हे अत्यंत निषेधार्ह आहे. खरंतर विष काँग्रेसने पेरलं आहे. समाजात विभाजनाचं विष पेरलं, देशात फाळणीचं विष पेरलं, भ्रष्टाचाराचं विष पेरलं आणि राजकारणात घराणेशाहीचं विष पेरलं असं म्हणत राय यांनी मल्लिकार्जुन खरगेंवर टीका केली आहे.

### अमित मालवीय यांनी काय म्हटलं आहे?

» भाजपाच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनीही ट्वीट करून मल्लिकार्जुन खरगेंवर टीका केली आहे. मल्लिकार्जुन खरगेंनी जे वक्तव्य केलं त्यातून त्यांची निराशा दिसते आहे. आज ते मोदींना विषारी साप म्हणाले आहेत याआधी सोनिया गांधी या मोदींना मौत के सौदागर असं म्हणाल्या होत्या. तेव्हापासूनच हे सगळं सुरु झालं आहे. काँग्रेसला पराभव दिसू लागला की अशी वक्तव्यं करण्यात येतात असंही अमित मालवीय यांनी म्हटलं आहे.

### मल्लिकार्जुन खरगेंनी दिलं स्पष्टीकरण

» मल्लिकार्जुन खरगेंवर मोठ्या प्रमाणावर टीका होऊ लागल्यानंतर त्यांनी या वक्तव्याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. मी जे वक्तव्य केलं ते व्यक्तीगत नव्हतं माझं म्हणणं होतं की मोदींची विचारधारा विषारी सापासारखी आहे. ही विचारधारा तुम्ही चाटायला गेलात तर तुमचा मृत्यू निश्चित आहे असं मला म्हणायचं होतं असं स्पष्टीकरण आता खरगे यांनी दिलं आहे. असं असलं तरीही त्यांच्यावर होणारी टीका काही थांबतना दिसत नाही.

# "पराभव दिसू लागला की भाजपा 'हाच' फंडा वापरते",

### अमित शाहांच्या 'त्या' विधानावर ठाकरे गटाचा हल्लाबोल!



। छत्तीसगड। महाईन्यूज ।

कर्नाटक विधानसभा निवडणुकांचं बिगुल वाजलं असून भाजपा आणि काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांनी समोरच्याला चीतपट करण्यासाठी कंबर कसली आहे. दोन्ही बाजूंनी राज्यात जोरदार प्रचार केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातलं आणि त्या अनुषंगाने देशाच्या राजकीय वर्तुळातलं वातावरण ढवळून निघत आहे. या प्रचारमोहिमांमध्ये दोन्ही बाजूकडच्या नेतेमंडळींकडून वेगवेगळ्या आश्वासनांबरोबरच अनेक दावेही केले जात आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या प्रचारमोहिमेत केलेल्या अशाच एका दाव्यावरून ठाकरे गटानं भाजपावर आगपाखड केली आहे.

**"गोरक्षकांच्या टोळ्यांच्या उन्मादाला खतपाणी"**

"केंद्रात मोदी सरकार आल्यापासून देशात आणि राज्याराज्यांत भाजपच्या या विद्वेषी राजकारणाचा अनेकदा प्रत्यय आला आहे. त्यासाठी वेगवेगळ्या मुद्द्यांचा आधार घेतला जातो. काही वर्षांपूर्वी कथित 'गो-रक्षकां'च्या टोळ्यांच्या उन्मादाला खतपाणी घातले गेले होते. म्हणजे भाजपशासित राज्यांत गोमांस विक्री सुरू ठेवायची, यांच्या नेत्यांनी गोमांस भक्षणाची ग्वाही जाहीरपणे द्यायची, मात्र विरोधकांच्या राज्यांत याच मुद्द्यांवरून धार्मिक तेढ निर्माण करायची आणि राजकारण साधायचे हे उद्योग केले गेले.

# आर्थिक मंदीची चाहूल!

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

### आता 'या' कंपनीने 8500 हजार कर्मचाऱ्यांची केली हकालपट्टी!

जागतिक मंदीमुळे जगभरातील अनेक आघाडीच्या कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपातीचा निर्णय घेतला आहे. यात आता आणखी एका कंपनीची भर पडली आहे. अमेरिकेतील 3M या कंपनीने ६००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची घोषणा केली आहे. या संदर्भात कंपनीने सांगितले की, अलीकडच्या काळात कंपनीच्या खर्चात वाढ झाली असून कामकाजात मात्र घट झाली आहे. अशा स्थितीत खर्च कमी करण्यासाठी कंपनीने अशा प्रकारे कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

3M कंपनीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, आम्ही वार्षिक खर्च मोठ्या प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या वार्षिक खर्चात किमान ९०० मिलियन डॉलर कपात करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. अशा स्थितीत कंपनीने कर्मचारी कपातीच्या दुसऱ्या टप्प्यात एकूण ६ हजार कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी कंपनीने २५०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले होते. आता नव्याने केलेल्या टाळेबंदीच्या घोषणेनंतर, कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्ये एकूण १० टक्के म्हणजेच ८५०० कर्मचाऱ्यांची घट झाली आहे.यावर 3M चे सीईओ माईक रोमन म्हणाले की, नफा वाढवण्यासाठी कंपनी आवश्यक असणारी सर्व पावले उचलत आहे. यामुळे कंपनीला गो-टू-मार्केट बिझनेस मॉडेल्स व्यवस्थितरीत्या राबवता येणार आहे. यामुळे कंपनीला मार्जिन आणि रोखप्रवाह सुधारण्यास मदत होईल.



# इजिप्तमध्ये तब्बल ३३०० वर्षे जुना खजिना सापडला!

## मंदिर, मूर्ती, कोरीवकाम पाहून पुरातत्त्वशास्त्रज्ञ चकित

।कैरो। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इजिप्तमध्ये कायमच ऐतिहासिक वास्तूंचे अवशेष सापडत असतात. इथल्या जमिनीच्या पोटात बरेच पुरातन अवशेष दडलेले आहेत. पिरॅमिड्समधील ममी असोत वा प्राचीन मकबरे, इजिप्तचा इतिहास नेहमीच चर्चेत राहिला आहे. आता इजिप्तच्या सक्कारामध्ये प्राचीन कब्रस्तानात जवळपास ३३०० वर्षे जुने मकबरे आणि मंदिरं सापडली आहेत.**

सक्कारामध्ये सापडलेला सर्वात मोठा मकबरा पॅनेसी नावाच्या व्यक्तीचा असल्याचं 'द वॉकिंग डेड ॲट सक्कारा' पुस्तकाच्या लेखिका लारा वीस यांनी सांगितलं. लारा यांनी स्वत:चं या उत्खनन मोहिमेचं नेतृत्त्व केलं. पॅनेसीचा मकबरा अतिशय व्यवस्थित तयार करण्यात आला होता. त्याला कोणीही मूलबाळ नव्हतं, अशी माहिती शिलालेखांवरून मिळते. या मकबऱ्यात मानवी अवशेषदेखील सापडले. मात्र हे अवशेष तिथे नंतर दफन करण्यात आल्याचं लारा यांनी सांगितलं. २०२४ मध्ये या अवशेषांचा सखोल अभ्यास केला जाईल.

सक्कारामध्ये आणखी एक मकबरा सापडला आहे. तो युयू नावाच्या व्यक्तीचा आहे. हा व्यक्ती सोन्याची पत्रं तयार करायचा. तो शाही कलाकार होता. त्याचा मकबरा पॅनेसीच्या मकबऱ्यापेक्षा लहान आहे. त्यात काही कलाकृतीदेखील आहेत. त्यातील बारकावे अतिशय सुंदर आहेत. यामध्ये त्याच्या चार पिढ्या दाखवण्यात आल्या आहेत. त्यात युयूचे आई-वडील, स्वत: युयू, त्याची पत्नी, मुलं, स्वत:ची भावंडं आणि नातवंडांचा समावेश आहे.

### जोडपे 50 वर्षांपासून तिथेच वास्तव्यास

» आणखी एक मकबरा सापडला आहे. मात्र त्याच्या मालकाबद्दल कोणतीही माहिती समजलेली नाही. त्यात दिसत असलेल्या मूर्ती पाहून ते चार जण एकाच कुटुंबातील वाटतात. मूर्ती अपूर्ण वाटत आहेत. मात्र या मूर्तींचं डिझाईन जवळच सापडलेल्या मूर्तींसारखंच आहे. या मूर्ती माया आणि मेरिट नावाच्या एका जोडप्याच्या होत्या. ते दोघे मकबरे उभारण्याआधी ५० वर्षांपासून तिथेच वास्तव्यास होते.



# सुश्मिता सेन लागली कंबर कसून कामाला



बॉलिवूड अभिनेत्री सुश्मिता सेनला गेल्याच महिन्यात हृदयविकाराचा झटका आला होता. अभिनेत्रीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही माहिती चाहत्यांना दिली होती. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर अँजिओप्लास्टीही करण्यात आल्याचं सुश्मिताने सांगितलं होतं. यातून आता पूर्णपणे बरी होत सुश्मिताने तिच्या कमाला सुरुवात केली आहे.

नुकतंच आगामी वेबसीरिज 'आर्या'च्या सीझन ३ च्या सेटवर अतिशय फिट लूकमध्ये सुश्मिताला पाहायला मिळालं. सुष्मिताने तिच्या या मोस्ट बहुचर्चित वेबसीरिजचे शूटिंग पुन्हा सुरू केले आहे. सुष्मिताने तिच्या सोशल मीडिया हँडलवर एक व्हिडिओ शेअर करत ही बातमी शेअर केली आहे. एक जबरदस्त पोस्टर टाकत, सुश्मिताने तिच्या ट्विटर हँडलवर एक टीझर देखील पोस्ट केला आहे.व्हिडिओ शेअर करत तिने कॅप्शनमध्ये लिहिले की, "ती स्वार्थी आहे. ती निडर आहे. ती परत आली आहे. आर्या सीझन ३ चे शूटिंग पुन्हा सुरू झाले आहे..."

या व्हिडिओ क्लिपमध्ये सुश्मिता खूपच फिट दिसत आहे. हातात तलवार घेऊन ती यामध्ये तलवारबाजी करताना दिसत आहे.

सुश्मिताच्या या वेबसीरिजची तिचे चाहते आतुरतेने वाट बघत आहेत, यातला सुश्मिताचा बिनधास्त आणि धासु अंदाज लोकांना चांगलाच पसंत पडला आहे.



याबरोबरच नुकतंच तिने 'ताली' या चित्रपटासाठी डबिंगदेखील पूर्ण केलं आहे. हा चित्रपट ट्रांसजेंडर समाज सेविका गौरी सावंतच्या जीवनावर बेतलेला आहे. यात सुश्मिता मुख्य भूमिका करत असून रवी जाधव यांनी याचं दिग्दर्शन केलं आहे.

# बाजीराव मस्तानीमध्ये दिसली असती भूमिका चावला

सलमान खान स्टारर 'तेरे नाम' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री भूमिका चावला नुकतीच 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटात सलमानसोबत दिसली आहे. या चित्रपटात तिने पूजा हेगडेच्या वहिनीची भूमिका साकारली आहे.

आता भूमिकाने नुकतेच जब वी मेटमध्ये करीना कपूर खानच्या जागी ती असली असती याचा धक्कादायक खुलासा केला आहे. यासोबतच संजय लीला भन्साळी यांच्या बाजीराव मस्तानी या हिट चित्रपटातही ती काम करणार होती, असा खुलासा तिने केला आहे.

बाजीराव मस्तानी 2015 मध्ये रिलीज झाला होता, ज्यामध्ये प्रियांका चोप्रा, रणवीर सिंग आणि दीपिका पदुकोण मुख्य भूमिकेत दिसले होते. मात्र, संजय लीला भन्साळी यांनी त्यांच्या 'हम दिल दे चुके सनम' या आयकॉनिक चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळेपासूनच हा चित्रपट करण्याचा विचार केला होता.

सलमान आणि शाहरुख खानसोबत हा चित्रपट बनवायचा होता पण तसे होऊ शकले नाही, असे भन्साळींनी शेअर केले होते. आता, सिद्धार्थ कन्ननशी बोलताना भूमिकाने खुलासा केला की, तिलाही या चित्रपटात भूमिकेची ऑफर देण्यात आली होती. यासाठी तिने स्क्रीन टेस्टही दिली पण त्यानंतर काहीच झाले नाही.

भूमिका पुढे म्हणाली, 'बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, तेरे नाम नंतर लगेचच माझी स्क्रीन टेस्ट झाली होती. मी सरांसोबत त्यांच्या स्टाइलमध्ये फोटोशूट केले होते. माझ्या साडीवर तूप आणि तेल सांडले आणि माझ्या साडीला आग लागली. मी त्याच्या स्टाईल मध्ये दिवे धरले होते आणि मग ते पडले. त्यावेळी मी सिल्कची साडी नेसली होती. काय झाले ते मला आठवते.'

याच मुलाखतीत भूमिकाने खुलासा केला की, 'जब वी मेट'मध्ये करीनाने तिची जागा घेतली होती, त्यानंतर तिला खूप वाईट वाटले होते. तिला मुन्नाभाई एमबीबीएस या चित्रपटात मुख्य भूमिकेची ऑफरही आली होती. जरी नंतर ग्रेसी सिंग या चित्रपटात दिसली.

# कंगनाने अनन्या पांडेची उडवली होती खिल्ली, व्हिडिओ होतोय

पंगा क्वीन कंगना नेहमीच तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. आता कंगनाचा नुकताच एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये कंगना चंकी पांडेची मुलगी अनन्या पांडेची खिल्ली उडवताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये कंगना कपिल शर्माच्या शोमध्ये पोहोचली, अनन्या पांडेची नक्कल करत तिला बॉलिवूड बिम्बो म्हणाली. या क्लिपमध्ये होस्ट कपिल शर्माने कंगनाला 'बॉली बिंबो'चा अर्थ विचारला. याला उत्तर देताना ती अनन्याचे नाव न घेता तिची खिल्ली उडवताना दिसली. काही भागांपूर्वी, अनन्याने उघड केले होते की ती तिच्या नाकाच्या टोकाला तिच्या जिभेने स्पर्श करू शकते आणि त्याला 'तिच्या प्रतिभांपैकी एक' म्हटले आहे. अनन्याची खिल्ली उडवत कंगनाने कपिलला सांगितले की, 'जे अशा प्रकारचे कृत्य करू शकतात ते बॉलिवूड बिम्बो आहेत.'अनन्याप्रमाणेच अभिनेत्रीने नाकाच्या टोकाला जिभेने स्पर्श करून तिची नक्कल करण्याचाही प्रयत्न केला. एका सोशल मीडिया वापरकर्त्याने दोन्ही व्हिडिओ एकत्र केले आणि ते इन्स्टाग्रामवर शेअर केले. "केवळ कंगना हे करू शकते" असे कॅप्शन लिहिले आहे.



# समांथाचा जबरा फॅन!

समांथा रुथ प्रभू ही दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री आहे. 'यशोदा', 'थेरी', 'माजिली', 'अ आ', 'अंजान', 'यु टर्न', 'पुष्पा' अशा सुपरहिट चित्रपटांतून समांथाने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. अभिनयाप्रमाणेच सौंदर्याने प्रेक्षकांना भुरळ घालणाऱ्या समांथाचा चाहता वर्गही मोठा आहे.

समांथाच्या अशाच एका जबरा फॅनने तिचं मंदिर बांधलं आहे. पिंकविलाने दिलेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील बापटला अलापडू गावात चाहत्याकडून समांथाचं मंदिर बांधण्यात येत आहे. या मंदिराचं बांधकाम सध्या सुरू असून समांथाच्या वाढदिवशी म्हणजेच २८ एप्रिलला याचं उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती आहे. समांथाच्या या जबरा फॅनचं नाव संदिप तेनाली असं आहे.

समांथा व तिच्या या चाहत्याची अद्याप भेट झालेली नाही. समांथाच्या प्रत्युषा फाउंडेशनच्या कामामुळे प्रभावित होऊन तिचं मंदिर बांधत असल्याचं संदिप तेनाली यांनी सांगितलं. समांथाच्या आधी अनेक दाक्षिणात्य व बॉलिवूड सेलिब्रिटींची मंदिरे त्यांच्या चाहत्यांनी देशातील विविध भागात बांधली आहेत. हंसिका मोटवानी, नयनतारा, अमिताभ बच्चन, सोनू सूद या कलाकारांच्या प्रेमापोटी चाहत्यांकडून त्यांची मंदिरे बांधण्यात आली आहेत.

दरम्यान, समांथा रुथ प्रभू 'शंकुतलम' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. १४ एप्रिलला हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. समांथा तिच्या आगामी 'खुशी' चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाता ती विजय देवरकोंडाबरोबर स्क्रीन शेअर करणार आहे.





# चेन्नईविरुद्ध रजवाडेच ठरले किंग!

## राजस्थानचा सीएसकेवर 32 धावांनी शानदार विजय

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३चा ३७वा सामना आज राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात संपन्न झाला. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर हा सामना खेळला गेला. राजस्थानचा संघ गेल्या दोन सामन्यात पराभूत झाला होता आणि सीएसकेचा संघ उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता. मात्र एवढे असूनही आज रजवाड्यांनी ३२ धावांनी सामना जिंकत आम्हीच खरे किंग आहोत हे दाखवून दिले. सीएसकेचा संघ गुणतालिकेत अव्वल होता तो राजस्थानने हिसकावून घेतला आणि आता ते पहिल्या स्थानावर आहेत.**

राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना आरआरने २० षटकांत ५ गडी गमावून २०२ धावा केल्या. प्रत्युत्तरात चेन्नईने ६ गड्यांच्या मोबदल्यात १७० धावाच करू शकली. यशस्वी जैस्वालने ४३ चेंडूत ७७ धावा केल्या. प्रत्युत्तरात चेन्नईचा संघ २० षटकांत ६ गडी गमावून १७० धावाच करू शकला. शिवम दुबेने ३३ चेंडूत ५२ धावा केल्या.

त्याचवेळी ऋतुराज गायकवाडने २९ चेंडूत ४७ धावांची खेळी केली. आयपीएलमधील हा राजस्थानचा २००वा सामना होता आणि त्यांनी जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदा २००+ धावा केल्या. त्यानंतर मोठा विजयही मिळवला.राजस्थान रॉयल्सचा अनुभवी गोलंदाज ट्रेंट बोल्टच्या गैरहजेरीतही राजस्थानच्या गोलंदाजांनी पॉवर-प्लेमध्ये कसून गोलंदाजी केली. डेव्हॉन कॉनवे आणि ऋतुराज गायकवाड या फॉर्मात असलेल्या फलंदाजांना



मोठा फटका मारता येत नव्हता. सहाव्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर कॉनवेने फटका मारला , परंतु तो संदीप शर्माच्या हाती विसावला, तो ८ धावांवर बाद झाला.

ऋतुराजने २९ चेंडूंत ५ चौकार व १ षटकारासह ४७ धावा केल्या. आर अश्विन आणि अजिंक्य रहाणे यांच्यात आज पुन्हा अश्विनने बाजी मारली. अश्विनने सहाव्यांदा अजिंक्यची ( १५) विकेट घेताना चेन्नईला अडचणीत आणले. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आलेला अंबाती रायुडू भोपळाही न फोडता तंबूत परतला. ॲडम झम्पाने आज ३ गडी बाद करत राजस्थानच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

या विजयासह राजस्थान संघ आठ सामन्यांत पाच विजय आणि १० गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. त्याला केवळ तीनच सामने गमवावे लागले आहेत. यासोबतच चेन्नईचा संघ आठ सामन्यांत चार विजय आणि चार पराभवांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. दुसऱ्या स्थानावर चेन्नईपेक्षा चांगला रनरेट आणि आठ गुणांसह गुजरात टायटन्स आहे. चेन्नईला पंजाब किंग्जविरुद्ध रविवारी चेपॉक येथे पुढील सामना खेळायचा आहे. त्याचवेळी राजस्थानला रविवारीच वानखेडेवर मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळायचे आहे.

---

# हरमनप्रीत कौरला लागली लॉटरी!

## BCCIकडून महिला खेळाडूंची केंद्रीय करार यादी जाहीर

। अस्ताना ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**बीसीसीआयने २०२२-२३ या वर्षासाठी भारताच्या महिला क्रिकेट खेळाडूंसाठी केंद्रीय करार जाहीर केला आहे. यामध्ये एकूण १७ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर व्यतिरिक्त सलामीवीर आणि उपकर्णधार स्मृती मंधाना आणि अष्टपैलू दीप्ती शर्मा यांना सर्वोच्च ए- श्रेणीमध्ये स्थान देण्यात आले आहे. एकूण ९ खेळाडूंना बी श्रेणीत आणि ५ खेळाडूंना सी श्रेणीमध्ये स्थान देण्यात आले आहे. बीसीसीआय ए- श्रेणीमध्ये समाविष्ट असलेल्या महिला खेळाडूंना वार्षिक रिटेनरशिप फी म्हणून ५० लाख रुपये देते. बी श्रेणीमध्ये उपस्थित असलेल्या खेळाडूंना ३० लाख रुपये आणि सी श्रेणीमध्ये प्रवेश करणाऱ्या खेळाडूंना १० लाख रुपये मानधन म्हणून दिले जातात.**

खरं तर, बीसीसीआयने हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना आणि दीप्ती शर्मा यांना महिला क्रिकेटपटूंच्या केंद्रीय कराराच्या यादीत प्रथम श्रेणी ए मध्ये ठेवले आहे, ज्यांना वार्षिक ५० लाख रुपये मिळतील. एकूण ५ खेळाडूंना ब श्रेणीत स्थान मिळाले असून त्यात रेणुका ठाकूर, जेमिमा रॉड्रिग्स, शफाली वर्मा, राजेश्वरी गायकवाड यांच्या नावाचा समावेश आहे. बी श्रेणीतील खेळाडूंना बीसीसीआयकडून वार्षिक ३० लाख रुपये मिळतील. उरलेल्या ९ खेळाडूंना सी श्रेणी मध्ये स्थान मिळाले आहे, ज्यात मेगना सिंग, देविका वैद्य, अंजली सरवानी, पूजा वस्त्राकर, सबिनेनी मेघना, स्नेह राणा, राधा यादव, हरलीन देओल, यासिका भाटिया यांचा समावेश आहे. या श्रेणीतील



खेळाडूंना १० लाख रुपये वार्षिक मानधन दिली जाईल. माहितीसाठी की गेल्या वर्षीच्या करारानुसार, राजेश्वरी गायकवाड यांची ए श्रेणीतून बी श्रेणीत बदली करण्यात आली आहे. तर पूनम यादवला यंदा करारातून वगळण्यात आलेले आहे. याशिवाय पूजा वस्त्राकर बी मधून सी श्रेणीत गेली आणि एकूण ७ खेळाडूंना बीसीसीआयच्या वार्षिक करारामध्ये प्रथम स्थान मिळाले, ज्यात रेणुका ठाकूर, मेघना सिंग, देविका, सबिनेनी मेघना, अंजली सरवानी, राधा यादव, यास्तिका भाटिया यांचा समावेश आहे. २६ मार्च रोजी बीसीसीआयने पुरुष क्रिकेटच्या खेळाडूंसोबत २०२२-२३ साठी वार्षिक करार जाहीर केला होता, ज्यामध्ये एकूण २६ खेळाडूंना स्थान मिळाले होते. पुरुषांच्या क्रिकेटचा विचार करता बीसीसीआयने ऐतिहासिक निर्णय घेतला होता की, महिलांना आता पुरुष खेळाडूंप्रमाणेच मानधन मिळेल, मात्र पुरुष खेळाडूंनुसार महिला खेळाडूंना कमी मानधन दिले जात आहे. पुरुष क्रिकेटमध्ये प्रथम श्रेणीच्या आधीची श्रेणी म्हणजेच (ए+) मधील खेळाडूंना एक वर्षासाठी ७ कोटी रुपये, ए श्रेणीसाठी ५ कोटी, बी श्रेणीसाठी ३ कोटी आणि सी श्रेणीतील खेळाडूंना १ कोटी रुपये मिळतील, तर महिला खेळाडूंची सुरुवातच ही ५० लाखापासून होते.

---

# ICCच्या निर्णयाने ऑस्ट्रेलिया खूश तर टीम इंडिया नाराज!

अस्ताना ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्याच्या तयारीत व्यस्त आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ७ जूनपासून इंग्लंडमध्ये अंतिम सामना रंगणार आहे. टीम इंडियाला २०१३ नंतर पहिली आयसीसी ट्रॉफी जिंकायची संधी आली आहे. २०१३ मध्ये एम.एस. धोनीच्या नेतृत्त्वाखाली चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती आता कर्णधार रोहित शर्माला ही सुवर्ण संधी आली असून त्याचे तो सोने करतो का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र, आता या अंतिम सामन्यासाठी वापरण्यात येणाऱ्या चेंडूमुळे भारतीय संघाची डोकेदुखी वाढली आहे.

दरम्यान, फायनलमध्ये वापरल्या जाणाऱ्या चेंडूबाबत आयसीसीकडून मोठी बातमी समोर येत आहे. भारतात कसोटी सामने एसजी चेंडूने खेळले जातात, तर ऑस्ट्रेलियात कुकाबुराचा चेंडू वापरला जातो. पण अंतिम सामना ड्युक चेंडूने होईल. क्रिकेटची जागतिक संघटना असलेल्या आयसीसीने ही माहिती दिली आहे. अंतिम फेरीसाठी दोन्ही संघांची घोषणा करण्यात आली आहे.

